
MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318
Issue-17, Vol-11, Jan. to Mar.2017
Vidyawarta®
International Multilingual Research Journal
Editor
Dr.Bapu G. Gholap
www.vidyawarta.com

https://sites.google.com/site/vidyawartajournal http://www.vidyawarta.blogspot.com

31) नांदेड जिल्ह्यातील विज्ञान विषयाचे अध्यापन करणाऱ्या प्राध्यापकांच्या वाचन अभिरुची : एक अभ्यास
**सिद्दीकी नईम अहेमद, डॉ. सौ. शालीनी एम. साखरकर, जि. नागपूर** || 107

32) शिवाजी महाराजांचे गुणसंकीर्तन
**राजेंद्र हिरामण सूर्यवंशी, जि.लातूर** || 110

33) साहित्य आणि समाजशास्त्र
**श्री. अशोक ठोसर, जि.औरंगाबाद** || 114

34) मुरबाड तालुक्याची ऐतिहासिक संस्कृती
**डॉ. श्री. निळकंठ रामचंद्र व्यापारी, जि. ठाणे** || 117

35) साहित्याच्या आंतरविद्याशाखीय अभ्यासाची आवश्यकता
**डॉ. राजाराम अं. झोडगे, जि. परभणी.** || 119

36) मिथिलेश्वर की कहानियों में राजनीतिक तथा आर्थिक ग्रामीण जीवन की अभिव्यक्ति
**प्रा. डॉ. महेंद्र जयपालसिंह रघुवंशी, नंदुरबार** || 122

37) निराला जी के काव्य में सामाजिक चेतना
**प्रा. प्रकाश बब्रुवान गायकवाड, बीड. (महाराष्ट्र)** || 126

38) सामाजिक समस्याओं के प्रति जागरूक गज़लकार - डॉ. कुँअर बेचैन.....
**डॉ. अभयकुमार आर. खैरनार, धुले** || 128

39) हज़रत अमीर खुसरो और सितार — एक शोध
**डॉ. पंकज लाहौरा, दिल्ली** || 130

40) वस्तु एवं सेवाकर (जीएसटी)
**सीमा नागर, धार (म.प्र.)** || 132

41) हारमोनियम के निर्माण में प्रयुक्त सामग्री
**राकेश कुमार, चण्डीगढ़** || 135

42) आदिवासी महिला श्रमिकों की स्थिति (बिलासपुर जिले के पेण्ड्रा तहसील के संदर्भ में).....
**डॉ. (श्रीमती) अभिलाषा सैनी, बिलासपुर** || 137

43) भारतीय संस्कृति में स्त्री सत्ता के स्वर
**Neha Goswami,Delhi** || 142

44) हिंदी उपन्यासों में लोक संस्कृति
**डॉ. महेंद्र जयपालसिंह रघुवंशी, नंदुरबार** || 149

45) क्रान्ति का स्वर : हिंदी नाटक—साहित्य.....
**गीता कुमारी, चंडीगढ़** || 153

"गुढी परंपरा सतत १० दिवस उभी करण्यासाठी महिनाभर या गुढीची सजावट केली जाते, याकामी गावातील ग्रामस्थांचे सहकार्य घेतले जाते." गुढी बनविण्यासाठी ६ मीटर कापड, लोखंडी रिंग, तांब्याचा किंवा पितळेच्या आवळ, माही १, ताईत १, ४ मोठे दोर, बांबु ३० फूटी लांब इतका असतो. दर पाच वर्षांनी मढीला (जि.अहमदनगर) होळीच्या दिवशी गावातील सर्व लोक पंचमीला पूजा करण्यासाठी व नवस फेडण्यासाठी जातात. या गुढीबरोबर गावदेवी, मरी आई, खंडोबा, कुलस्वामीनी इत्यादी देवतांची पुजा केली जाते.

"गुढीद्वारे जनमाणसांत जनजागृती घडून येण्यास मदत झाली. लोक आपुलकीने या सणसमारंभात सहभागी होत." ढोलकाठीची सुरूवात सकाळी १० वाजता होऊन ही ऐतिहासिक गुढी या तालुक्यातील कांदली, पन्हे, पिंपळघर, व्यापारी मानिवली, पारतळे (दहिवली), नागांव, मोहोप (नारायणगांव) याठिकाणाहून ही गुढी दुपारी १ वाजेपर्यंत मोहोप या गावी पोहोचते. या सर्व भक्तजणांचे दुपारचे जेवण मोहोप गावातील प्रतिष्ठित व्यक्ती श्री. तुकाराम सिताराम मोहपे यांच्याकडे होते. त्यानंतर दुपारी ३ वाजता या गावाहून निघाल्यानंतर ती कांदली या ठिकाणी पोहोचण्यास संध्याकाळचे ७ वाजतात. या सणसमारंभात (गुढीमध्ये) अंगात येणारी एक व्यक्ती असते. तिला देव अंगात आले, असे म्हणतात. यावेळी पुजा केली जाते. या पूजेच्या ताटात नारळ, कापूर, अगरबत्ती, हार, फुले इत्यादीचा वापर करून देवाला पुजतात व आनंदाने या गुढीत सामिल होतात.

**संदर्भ साधने –**

१. Gazetteer of the Bombay presidency, Thana places of Interest, Vol. XIV Government of Maharashtra, Bombay, 1882.

२. Maharashtra State Gazetteer, Thane District, Vol. XIII, Part II, Government of Maharashtra, Bombay, 1982.

३. कुलकर्णी व्ही. ए., ठाणे जिल्हा स्वतंत्र आंदोलन, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे विद्यापीठ, २००६.

४. श्री. वामन लडकू मोहपे यांची दि. ९ फेब्रुवारी २०१२ रोजी घेतलेली मुलाखत पन्हे (मुरबाड), जि. ठाणे.

❑❑❑

35

# साहित्याच्या आंतरविद्याशाखीय अभ्यासाची आवश्यकता

डॉ. राजाराम अं. झोडगे
मराठी विभाग, नूतन महाविद्यालय, सेलू जि. परभणी.

आजच्या युगाला माहिती - तंत्रज्ञानाचे युग, ज्ञानयुग म्हणून संबोधले जाते. माहितीचा प्रचंड विस्फोट आज घडून येत आहे. विज्ञान - तंत्रज्ञानाच्या प्रभावातून रोज नवनवे संशोधन होत असून त्यातून नवी तथ्ये, निष्कर्ष समोर येत आहेत. काळाच्या गरजेतून नव्या ज्ञानशाखांचा उदय होतो आहे. ज्ञानक्षेत्राच्या वाढीचा आलेख सतत वाढत असतो. प्रत्येक ज्ञानशाखा आपापल्या परीने सामाजिक उत्थान, प्रगतीसाठी योगदान देत असते. मात्र कोणतेही शास्त्र किंवा ज्ञानशाखा ही स्वयंपूर्ण अथवा परिपूर्ण असतेच असे नाही. प्रत्येक क्षेत्रातील ज्ञानाला मर्यादा असतात. त्यामुळे विविध ज्ञानशाखांमध्ये ज्ञान, विचारांच्या, माहितीच्या परस्पर देवाणघेवाणीची गरज असते. एका क्षेत्रातील ज्ञान दुसऱ्या क्षेत्रासाठी उपयुक्त ठरू शकते. त्यातूनच आज आंतरविद्याशाखीय अभ्यासपध्दतीची आवश्यकता मोठ्या प्रमाणावर निर्माण झाली असून तशा प्रकारचे अभ्यास - संशोधनही होतांना दिसत आहे. कोणत्याही भाषेतील साहित्यही याला अपवाद असू शकत नाही.

साहित्य ही व्यक्तीमनाची निर्मिती असली तरी तिच्या प्रेरणा, त्यातील आशय, पात्रे, माध्यम असणारी भाषा इ. बाबी सामाजिक असतात. त्यामुळे साहित्याचा अभ्यास करतांना त्यातील आशयानुरुप त्याचा वेगवेगळ्या अंगांनी अभ्यास करता येणे शक्य असते. त्यातून त्याचे विविध पैलू उलगडून त्या साहित्याकृतीला अधिक न्याय देता येतो. म्हणूनच साहित्याचा आंतर विद्याशाखीय दृष्टीकोनातून अभ्यास गरजेचा वाटतो. या पध्दतीत साहित्याचा इतर विविध सामाजिक शास्त्रे, ज्ञानशाखा यांच्यातील परस्पर संबंध, प्रभाव याचा वेध घेतला जातो. "आजकाल आंतर्विद्याशाखीय अध्ययनाचे महत्व जाणवत आहे, याचे कारण हेच असावे की माणसापेक्षा श्रेष्ठ या जगात दुसरे काहीच नाही. सर्व मानवी व्यवहार मनुष्यकेंद्रितच आहेत. अर्थात सर्व ज्ञानशाखांचे लक्ष्य मनुष्य हाच असेल, तर या सर्व शाखांचा, अध्ययन पध्दतींचा संबंध जोडता येऊ शकतो. साहित्यात ज्या सामाजिक,

राजनैतिक, नैतिक, धार्मिक, अर्थिक, ऐतिहासिक, शैक्षणिक, घटना, प्रसंग आणि इतर बाबीची व पात्रांची सरमिसळ आणि घालमेल दाखविलेली असते तिचा उपयोग इतर ज्ञानशाखांच्या अध्ययनासाठी उपयुक्त सामग्री म्हणून होऊ शकला, तर साहित्याच्या उद्देशामध्ये फार मोठी भर पडू शकते"[1] त्यामुळे आज साहित्य आणि समाज, साहित्य आणि राजकारण, मानसशास्त्र असा अभ्यास काही प्रमाणात होतांना दिसतो आहे.

साहित्य हे केवळ मनोरंजनाचे, वेळ काढण्याचे (टाईमपास) साधन नाही. साहित्यातून मानवी जीवनातील विविध अनुभव, सुख दुःखे, भाव - भावना, वेदना, प्रेम, मांगल्य, हिंसा - अहिंसा, समता, करूणा, इतिहास, वर्तमान आदी बाबींचे दर्शन घडत असते. साठोत्तरी काळातील विविध साहित्य प्रवाहांतून आलेले साहित्य हे अधिक समाजाभिमुख आहे या साहित्यातून जीवनजाणीवा, वास्तव समाजदर्शन या बाबी प्रखरतेने अधोरेखित झालेल्या आहेत. त्यामुळे मराठी साहित्याला बहुपेडी परिमाण लाभले. अशा साहित्याकडे केवळ एकाच अंगाने पाहून चालणार नाही.

समाज हा साहित्याचा आस्थाविषय आहे. समाजजीवन हे बहुरंगी, बहुढंगी असते. मानवाच्या सामाजिक जीवनात त्याला विविध परिमाण लाभलेले असतात. विविध सामाजिक संस्थांचा व्यक्तींच्या आणि समाजाच्या धारणांवर पगडा, प्रभाव असतो. साहित्यिक आपल्या साहित्यात सामाजिक अनुभव, भाव - भावनांचे चित्रण करत असतांना समाजजीवनाचे विविध पैलू त्यातील ताण्याबाण्यासह साहित्यातून येत असतात. त्यामुळे तत्कालीन सामाजिक, राजकीय, धार्मिक, अर्थिक, शैक्षणिक परिस्थिती इ. चा परिणाम, साहित्यनिर्मितीवर होत असतो. यामुळे वरील परिस्थितीचा अभ्यास करणारी समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, शिक्षणशास्त्र आदी सामाजिक शास्त्रांशी सहजच साहित्याचा एक अनुबंध निर्माण होतो. साहित्य आणि सामाजिक शास्त्रे या दोन्हींचाही केंद्रबिंदू माणूस हाच आहे. ध्सामाजिक शास्त्रे ज्या समाजाचे अवलोकन करून, सामग्री गोळा करून शास्त्रीय प्रणालीच्या आधारे आपले निकष अधिकाधिक वस्तुनिष्ठ ठेवून निष्कर्ष काढीत असतात, त्याच समाजाचे अवलोकन करून, सामग्री गोळा करून पात्र आणि प्रसंग यांच्या क्रिया - प्रतिक्रिया आजमावित साहित्याकार आपले निष्कर्ष काढीत असतांडडन अर्थात साहित्यिकाचे निष्कर्ष वस्तुनिष्ठ असतीलच असे नाही. मात्र साहित्य आणि इतर शास्त्रे यांच्यात मनुष्य, समाज हा समान आस्थाविषय असल्याने ती परस्परांना पूरक ठरू शकतात.

मराठी साहित्याच्या अभ्यासक्षेत्रात एखाद्या साहित्यकृतीचा अभ्यास करतांना त्यातील मुख्य आशय सुत्राच्या अनुषंगाने त्याकडे विशिष्ट दृष्टीकोनातूनच पहिले जाते. त्यातून अमुक कथा किंवा कादंबरी सामाजिक आहे, राजकीय, ग्रामीण, स्त्रीवादी, दलित आहे असे शिक्के त्यावर मारले जातात. परंतु त्या कलाकृतीत मुख्य आशय, विषय ज्या घटितांच्या, पर्यावरणाच्या संयोगातून, साहचर्यातून येतो असेही काही पैलू ध्यानात घेतले तर तो अभ्यास केवळ एकसुरी न ठरता समावेशक होऊ शकेल असे वाटते. मध्ययुगीन संतवाङ् - मयाकडे केवल आध्यात्मिक साहित्य, भक्तीसाहित्य म्हणूनच पाहणे इष्ट ठरेल का ? तर नाही या साहित्यातून तत्कालीन समाजजीवन, लोकमानस, राज्यव्यवस्था आदी बाबींचेही चित्रण आलेले असते. त्या अनुषंगानेही अभ्यास गरजेचा ठरतो. आज आपण संत तुकारामांच्या साहित्याचा सामाजिक, वैज्ञानिक, मानसशास्त्रीय, वाङ्मयीन तत्त्वज्ञान अशा विविध दृष्टीकोनांतून अभ्यास करतो आहोत तो यातूनच.

एखादी साहित्यकृती विशिष्ट आशयसुत्रांवर, प्रदेशावर, समस्येवर, कथासूत्रांवर बेतलेली असली तरी ते आशयसूत्र पुर्णपणे स्वतंत्र, समाजनिरपेक्ष असत नाही. सामाजिक समस्या या एकमेकांत गुंतलेल्या असतात समाजजीवनातील गुंतागुंत साहित्यात अविष्कृत झालेली असते. त्यामुळे एकाच कसोटीने त्या कृतीचे पूर्ण आकलन होऊ शकणार नाही. सदानंद देशमुख यांची बारोमास ही कादंबरी कृषीजीवनावर आधारलेली आहे. परंतू तिच्यावर केवळ ध्रामीणड असा शिक्का मारून चालणार नाही. या कादंबरीत आलेल्या शेतकऱ्यांची दुरावस्था, आत्महत्या, शासकीय धोरणे, उत्पन्न, नफा, कुटुंब, बेकारी आदींच्या अनुषंगाने ग्रामीण अर्थशास्त्र, समाजव्यवस्था, शिक्षण व्यवस्था, लोकमानस, संस्कृती असे पैलूही ध्यानात घ्यावे लागतात. म्हणजेच आर्थिक सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, मानसिक अशा विविध पैलूंतुन केलेला अभ्यास त्या साहित्य - कृतीला अधिक न्याय देऊ शकेल व कादंबरीत चर्चित समस्येच्या मुळाशी जाऊन ती आपणांस समजून घेता येईल. यासाठी इतर सामाजिक शास्त्रांची आपणांस मदतच होते.

साहित्य आणि समाज यांतील संबंध सर्वश्रुत आहेत त्यामुळे साहित्य आणि समाजाचा अभ्यास करणारे समाजशास्त्र या दोन्हींच्या आंतरविद्याशाखीय अभ्यासाबरोबरच इतिहास, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, मानसशास्त्र, तत्त्वज्ञान अशा शास्त्रांचाही साहित्याशी अनुबंध अभ्यासता येतो. इतिहास आणि साहित्य यांच्यातील सीमारेषा बरेचदा धुसर झाल्याचे दिसते. पुरातन साहित्यात चित्रित पात्रे, घटना, परिस्थिती यावरून तत्कालीन इतिहास इतिहासकाराला समजून घेण्यास मदत होते तर ऐतिहासिक, पौराणिक साहित्याच्या अभ्यासासाठी इतिहासाचा अभ्यास साह्यभूत ठरतो. पाठचिकित्सा, अधिकृत पाठनिर्णय यांसाठीही इतिहासाची मदत महत्त्वाची ठरते.

राजकारण ही आज सर्वव्यापी बाब बनली आहे. जीवनाच्या सर्वच क्षेत्रात राजकारणाने शिरकाव केला असल्याने मानवी जीवनाचे

चित्रण करणाऱ्या साहित्यातूनही ते वर्ज्य कसे राहील. आज मराठीत अनेक कथा, कादंबऱ्या, कविता या राजकीय जीवनावर बेतलेल्या, त्यावर भाष्य करणाऱ्या आहेत त्यामुळे साहित्य आणि राजकारण, राज्यशास्त्र यांचाही अनुबंध अभ्यासणे गरजेचे ठरते. राजकीय कथा, कादंबरी लिहिणाऱ्या लेखकाला सत्ताकारण, राजकीय डावपेच, राज्यव्यवस्था, प्रशासन इ. समजून घेण्यासाठी राज्यशास्त्र अभ्यासावे लागते तर साहित्यिकाने आपल्या साहित्यात बारकाईने टिपलेले राजकीय चित्रण, राजकारण्यांच्या वृत्ती - प्रवृत्ती, जनमानसावरील प्रभाव, अंतर्विरोध यातून समकालीन राजकारण समजून घेणे राजकीय अभ्यासकाला सोयीचे होऊ शकते.

राज्यशास्त्र हे समाजाच्या राजकीय तर अर्थशास्त्र हे समाजाच्या आर्थिक अंगाचा विचार करते. अर्थव्यवस्था ही समाजातील एक महत्वाची मूलभूत व्यवस्था - संस्था असते. सामाजिक व्यवहारांच्या विनियमनाची ती एक महत्वाची बाजू ठरते. साहित्यात समाजाचे चित्रण करतांना त्यातील आर्थिक बाजूही त्यात येत असते. दारिद्रय, विषमता, कृषीव्यवस्था, जीवनमान या साहित्यातून येणाऱ्या बाबी या अर्थशास्त्राशी संबंधित असतात. त्यामुळे साहित्य आणि अर्थशास्त्र या अंगानेही अभ्यास गरजेचा ठरतो.

साहित्य ही मानवी मनाची निर्मिती असते. लेखक आजूबाजूचे वास्तव साहित्यात अविष्कृत करत असला तरी ते जसेच्या तसे (As it is) असत नाही. आपल्या प्रतिभाशक्तीच्याद्वारे तो काल्पनिक विश्व तयार करतो व त्यातून त्याला जे मांडावयाचे आहे ते तो मांडतो. साहितयात माणासांच्या मनोवृत्ती, क्रिया - प्रतिक्रिया, विविध स्वभावाचे नमुने चित्रित झालेले असतात. विशिष्ट प्रसंगात पात्रे कशी वागतात ? का वागतात ? अशा बाबी मानसिकतेशी संबंधित असतात. मानवी मनाचा अभ्यास करणाऱ्या मानसशास्त्राच्या आधारे आपणाला पात्रांचा मनोव्यापार समजून घेणे शक्य होते. त्यामुळे साहित्य व मानसशास्त्रे हे परस्परांना पूरक ठरू शकतात.

साहित्यात मानवी वर्तनाचे, भावभावनांचे अविष्करण झालेले असते. व्यक्तिरेखांच्या कृती - उक्तीमागे काही ताण - तणाव, मानसिक कारणे असतात. बरेचदा ती अशी का वागतात हे सहजपणे लक्षात येत नाही अशा वेळी साहित्याभ्यासकाला मानसशास्त्राची मदत घ्यावी लागते. विजय तेंडुलकर, ग्रेस, जी.ए. कुलकर्णी यांच्या काही कलाकृती मानसशास्त्रीय दृष्ट्याच समजून घ्याव्या लागतात. गुंतागुंतीच्या मानसिक प्रक्रिया आणि गुढ मनोव्यापार मानसशास्त्राच्या आधारेच समजून घेता येतो. मानसशास्त्राचा संबंध साहित्यनिर्मिती अथवा आकलनाबरोबरच साहित्यसमीक्षेशीही येतो. त्यामुळे साहित्य आणि मानसशास्त्र असा अभ्यास महत्वपूर्ण ठरतो.

लोकशिक्षणाचे माध्यम म्हणून साहित्याचा वापर पूर्वीपासूनच झालेला आहे. प्राचीन लोक कथा, लोकगीते, मध्ययुगीन काळातील संतवाङ्मय यांतून नीतीमूल्ये, व्यवहारज्ञान, समता इ. चे धडे दिले गेले. अशा साहित्याची विपूल निर्मिती व प्रचलन समाजात झालेले दिसून येते. त्यामुळे साहित्य व शिक्षण असाही एक अनुबंध अभ्यासता येतो. साहित्यातून सत्य, न्याय, समता, बंधुता, अहिंसा, स्वातंत्र्य, देशप्रेम आदी मूल्ये अविष्कृत झालेली असतात. लेखकाच्या, अनुभवातून आलेले जीवनातील बारकावे त्यात चित्रित झालेले असतात. त्यामुळे शिक्षणाचे, प्रबोधनाचे एक माध्यम म्हणून साहित्य कार्य करते. साहित्याचा शिक्षणाशी असणारा अनुबंध केवळ शिक्षणाचे एक माध्यम - साधन एवढ्यापुरताच मर्यादित नाही, तर साहित्यात समाजाचे चित्रण येत असताना समाजातील एक महत्वाचा घटक म्हणून तेथील शिक्षणव्यवस्था, त्यातील उणिवा, त्याचा समाजावरील परिणाम आदी बाबींचेही चित्रण आपसूकच येत असते. त्यामुळे साहित्यातून तत्कालीन शिक्षणव्यवस्था, तिची स्थिती - गती इ. संबंधीची समज शिक्षणशास्त्राच्या अभ्यासकाला मिळू शकते. मराठीत बिढार, जरीला, झूल, चक्रव्यूह, कोंडणातलं जिणं, निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी, बॉन्साय अशा कितीतरी कादंबऱ्या शिक्षणक्षेत्राशी संबंधित आढळतात. त्या अनुषंगाने साहित्य आणि शिक्षणशास्त्र किंवा शिक्षणव्यवस्था असा अभ्यास महत्वपूर्ण ठरू शकतो.

साहित्यातून अभिव्यक्त होणारा बहुपेडी, बहुआयामी आशय, त्याचा इतर शास्त्रांवर पडणारा प्रभाव तसेच समाजजीवनाचा अभ्यास करणाऱ्या इतर शास्त्रांचा, ज्ञानशाखांचा साहित्यावरील, साहित्यिकावरील पगडा, प्रभाव या अनुषंगाने साहित्य आणि संस्कृती, साहित्य आणि तत्वज्ञान, साहित्य आणि विज्ञान, साहित्य आणि सौंदर्यशास्त्र या अंगानेही अभ्यास होणे गरजेचे आहे. शिवाय केवळ दोन वा अधिक ज्ञानशाखा शास्त्रांबरोबरच एखाद्या साहित्यकृतीचा राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, अर्थशास्त्रीय, मानसिक, ऐतिहासिक, सौंदर्यशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास त्या कलाकृतीचे विविध पैलू उलगडवणारा ठरतो. त्यामुळे मराठी साहित्याभ्यास एकाच विशिष्ट आवर्तात सापडणार नाही. साहित्याची आंतरविद्याशाखीय अभ्यास पध्दती मराठीत फारशी विस्तारली नसली तरी ती रुजते आहे व येत्या काळात ती अधिक बाळसे धरेल यासाठी सर्वंकष प्रयत्नांची गरज आहे.

**संदर्भ:**

०१. काळे, प्रा. अनिल, सहित्य आणि इतर ज्ञानशाखांचा संबंध, सक्षम समीक्षा, जुलै - सप्टें. २०११, पृ. ६१.

०२. साने, डॉ. ह. श्री. (संपा.) सामाजिक शास्त्रे आणि साहित्य : अंत:संबंध, प्रतिमा प्रकाशन, पुणे १९९५, पृ.९.

०३. राणे, डॉ. श.रा., मराठी साहित्यसंशोधन : स्वरुप आणि दिशा, का.स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे १९९५

❑❑❑

## How to write a Research paper

A research paper can be written on any topic in concerning the subjects. A research paper comprises such as abstract, introduction, word pattern, review of literature, analysis and bibliography. Vidyawarta publish articles and research papers in all subject and in all faculties.

## How to send papers ?

Computerised typed matter of articles be sent only by e-mail to vidyawarta@gmail.com in Pagemaker or MS-word format file. Please don't sent PDF, scanned pages or photos pages. Articles be sent using their own e-mail ID.

## About format and font ?

1. For Hindi and Marathi, use DVB-TT-Surekh or Kruti Dev 055 or shreelipi 708, size 14, normal setting. In case of the use of graphs, maps, pictures and tables all be used in the right places and in appropriate setting. Articles may be written in 3000 word (5-6) pages. After fulfilling all these formalities you may contact the editor, Bapu Gholap.




## How to submit fee?

After the acceptance of your paper, you may deposit the fee from any nationalised banks to vidyawarta. You may use online banking, offline money order, cheque deposit or mobile application for depositing the fee. It is obligation to send the transaction details of fees or may call the editor after depositing fee.

## Do not forget this..!

- Write your full name, Address, Pin code, Mob. No. Email ID.
- Make sure whether your email has been received or not to Vidyawarta.
- You may deposit the amount of the number of copies you required.
- Send the receipt of the deposited fee.
- The research paper should be unpublished, complete and correct in all aspects.
- Undertaking form should be filled in with own handwriting
- Mention the name of the journal (ie. Printing Area, Vidyawarta you want to publish your article.


**Publisher & Owner**

*Archana Rajendra Ghodke*

Harshwardhan Publication Pvt.Ltd

At.Post.Limbaganesh, Tq.Dist.Beed

Pin-431126 (Maharashtra)

IMPACT FACTOR 4.014



**Edit By**

Dr. Gholap Bapu Ganpat

Parli Vaijnath, Dist.Beed 431 515

(Maharashtra, India)

Cell : +91 75 88 05 76 95


ISSN-2319 9318